आजचे कार्यक्रम

* स्व. अॅड. द. तु. जायभावे स्मृती व्याख्यान
वक्ते : चक्रोर बाविस्कर, न्यायाधीश, मुंबई
विषय : संतांचे समकालीनत्व

* सरगम म्युजिक अकादमी प्रस्तूत : नंदुकुमार देशपांडे निर्मित : गर्जतो मराठी (म्हाटमोळी गाणी)

* ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे विषय : आम्ही भारताचे लोक

केवडीबन म्हसोबा यात्रोत्सव समिती अध्यक्षपदी अॅड. गोवर्धने

पंचवटी । शेकडो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या केवडीबन येथील श्री म्हसोबा महाराज देवस्थान यात्रा उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अॅड. गौरव गोवर्धने यांची तर उपाध्यक्ष पदी अंबादास खैरे यांची देवस्थान ट्रस्टच्या वतीने नियुक्ती करण्यात आली.

यावेळी कार्याध्यक्षपदी आमदार राहुल ढिकले, उपाध्यक्ष अंबादास खैरे, सहकार्याध्यक्ष डॉ. दिनेश बच्छाव, सचिव समाधान जाधव, सहसचिव हेमंत शेट्टी, खजिनदार धनंजय माने, सहखजिनदार कैलास क्षीरसागर, संघटक प्रमुख मच्छिंद्र सानप, सहसंघटक महेंद्र आव्हाड, दिगंबर मोगरे, मंगेश धनवटे आदी पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.

प्रोग्रेसिव्ह महाविद्यालयात तन्वी प्रथम

नाशिकरोड । प्रतिनिधी

जेलरोड येथील प्रोग्रेसिव्ह सायन्स अॅन्ड कॉमर्स ज्युनियर कॉलेजचा निकाल शंभर टक्के लागला. विज्ञान शाखेत निनाद गाढे (६३.५०) प्रथम तर आज्ञा शिंदे (६०.८३) व्दितीय आली. वाणिज्य शाखेत यश रत्नपारखी (८६.६७) प्रथम, तन्वी भोले (८६.८३) व्दितीय आणि दिया पटेल (८२.८३) तृतीय आली. विज्ञान शाखेचे २३ तर वाणिज्य शाखेचे २० विद्यार्थी परीक्षेला बसले होते. सर्व उत्तीर्ण झाले.

पान १ वरून...

टक्का घसरला

पत्रकार परिषदेमध्ये निकाल जाहीर केला. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे ११ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२५ दरम्यान बारावीच्या परीक्षा घेण्यात आल्या. राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून विज्ञान, कला, वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रम व आय.टी.आय. या शाखांसाठी एकूण १४,२७,०८५ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४,१७,९६९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी १३,०२,८७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्णतेची टक्केवारी ९१.८८ आहे.

खासगी विद्यार्थी म्हणून नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ३६,१३३ एवढी असून, त्यापैकी ३५,६९७ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून २९,८९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ८३.७३ आहे.

या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळांमधून सर्व शाखांमधून एकूण ४२,३८८ पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४२,०२४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी १५,८२३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ३७.६५ आहे.

या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळांमधून सर्व शाखांमधून एकूण ७,३१० दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ७,२५८ दिव्यांग विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी ६,७०५ दिव्यांग विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ९२.३८ आहे.

३३७३ केंद्रापैकी १२४ केंद्राची गैरप्रकार आढळल्याने चौकशी होणार आहे. या चौकशी दरम्यान त्रुटी आढळल्यास १२४ परीक्षा केंद्र बोर्ड कायमस्वरूपी बंद करण्यात येणार आहेत. पुणे ४२, नागपूर ३३, छत्रपती संभाजीनगर २१४, मुंबई ९, कोल्हापूर ७,अमरावती १७, नाशिक १२, लातूर ३७, असे एकूण ३७४ कॉपी प्रकार उघडकीस आले असल्याचेही यावेळी शरद गोसावी यांनी सांगितले.

बारावी परीक्षेत राज्यात मुलींची बाजी मारली आहे. सर्व विभागीय मंडळातून नियमित मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.५८ टक्के असून मुलांची उत्तीर्णतेची टक्केवारी ८९.५१ टक्के आहे. यंदा एकाही विद्यार्थ्याला १०० टक्के गुण मिळालेले नाहीत. पण, १९२९ कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल १०० टक्के लागला आह

विभागनिहाय निकाल

कोकण	९६.७४ टक्के	कोल्हापूर	९३.६४ टक्के
मुंबई	९२.९३ टक्के	छत्रपती संभाजीनगर	९२.२४ टक्के
अमरावती	९१.४३ टक्के	पुणे	९१.३२ टक्के
नाशिक	९१.३१ टक्के	नागपूर	९०.५२ टक्के
लातूर : ८९.४६ टक्के			

शाखानिहाय निकाल

विज्ञान	९७.३५ टक्के	कला	८०.५२ टक्के
वाणिज्य	९२.६८ टक्के	व्यवसाय अभ्यासक्रम	८३.२६ टक्के
आयटीआय ८२.०३ टक्के			

चौंडीच्या मंत्रिपरिषदेत धनगर आरक्षणावर चर्चा?

अशी मागणी सातत्याने धनगर समाजाकडून सुरु आहे. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत धनगर आरक्षणाचा निर्णय मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत घेतला जाईल, असे आश्वासन दिले होते. राज्य सरकारने तसा ठराव केंद्र सरकारला पाठवला आहे. मात्र, धनगर आरक्षणाची मागणी प्रलंबित असताना राज्य सरकारने अनुसूचित जमातीला मिळणाऱ्या शासकीय लाभ धनगर समाजाला देण्याचा निर्णय घेतला आहे. तरीही आज पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जन्मगावी राज्य मंत्रिपरिषदेची बैठक होत असल्याने या बैठकीत काही मंत्र्यांकडून धनगर आरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला जाऊ शकतो.

नेत्रतपासणी शिबिर

नाशिकरोड । प्रतिनिधी

निर्मला लोक कल्याण प्रबोधिनी व मुक्ता आय क्लिनिक नाशिकरोड यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी उपक्रम रविवार दि. ४ ते १० मेपर्यंत दररोज सकाळी १० ते २ वाजेपर्यंत आयोजित केले आहे.

या उपक्रमात मोफत डोळे तपासणी, मोतीबिंदू रुग्णांसाठी सवलतीच्या दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच नंबरचे चष्मे सवलतीच्या दरात दिले जातील. तसेच नेत्ररोग रुग्णांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते निवृत्ती अरिंगळे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी ना.रोड अध्यक्ष मनोहर कोरडे, संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर देवरे, सरचिटणीस डॉ. ए. एस. तांबोळी, आय सर्जन डॉ. शुभांगी मोरे, मंगेश लांडगे, आशा जाधव, चिटणीस संदीप वराडे, सागर चव्हाण, ताहीर शेख आदी कार्यक्रमास उपस्थित होते.

मेट इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धेत यश

नाशिक । येथील मेट इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग्या मेकॅनिकल इंजिनीअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धेत विभागात प्रथम क्रमांक पटकावला.

मलकापूरच्या व्ही. बी. कोलते कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग यांनी स्पर्धा आयोजित केली होती. अथर्व येवले, आर्यन आहेर, प्रणव कुटे, आणि आदित्य कापसे या विद्यार्थ्यांनी डिजाईन अँड मॅन्युफॅक्चरिंग ऑफ टेस्ट रिग फॉर बस बार टेस्टिंग या विषयावर प्रकल्प सादर केला. त्यांना डॉ. शरद निरगुडे यांचे मार्गदर्शन लाभले. विभागप्रमुख डॉ. श्यामकुमार काळपांडे व प्राचार्य डॉ. व्ही. पी. वाणी यांनी अभिनंदन केले.

पतंजलीचे आंतरराष्ट्रीय संशोधन जर्नल प्रकाशित

हरीद्वार । पतंजलीचे आंतरराष्ट्रीय संशोधन जर्नल संशोधन जगातील प्रतिष्ठित एल्सेव्हियर पब्लिकेशनच्या बायोमेडिसिन अँड फार्माकोथेरपी या आंतरराष्ट्रीय संशोधन जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे.

प्लास्टिकमुळे होणाऱ्या गंभीर आरोग्य समस्यांवर हे संशोधन करण्यात आले आहे. लहान प्लास्टिक कण आता हवा, पाणी आणि अन्नामध्ये सापडत असून मानवाकडून नकळत रोज सेवन केले जात असल्याने जळजळ, चिडचिड आणि सेल्युलर नुकसान यासारख्या समस्या निर्माण करतात. यामुळे फुफ्फुसाचा दाह आणि वायूमार्ग हायपर-रिस्पॉन्सिव्हनेस सारखे गंभीर रोग होऊ शकतात. पतंजलीच्या शास्त्रज्ञांनी उंदरांवर केलेल्या ताज्या संशोधनाने मायक्रोप्लास्टिक्समुळे होणारी फुफ्फुसाची कार्यक्षमता कमी होणे आयुर्वेदिक औषध ब्रॉन्कोमेद्रारे मोठ्या प्रमाणात रोखले जाऊ शकत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

यशवंत क्लासेसचा शंभर टक्के निकाल

नाशिक । इयत्ता १२ वी विज्ञान व वाणिज्य शाखांमध्ये १००टक्के निकाल मिळवून यशवंत क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे. संचालक प्रा.भालचंद्र पाटील यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विज्ञान शाखेचा कार्तिक पुरोहितने ९३.२ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. दर्शना पाटील ८९.१टक्के, हुसैन शेख ८६.२५टक्के, महेश गवळी ८२.१२ टक्के, आणि हर्षदा पाडवी ८१.६टक्के यांनीही उत्तम गुण मिळवून यश प्राप्त केले. कॉमर्समध्येही विद्यार्थ्यांनी १००टक्के यश मिळवले.

कोठारी अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे यश

नाशिक । राज्य शैक्षणिक मंडळाच्या एचएससी परीक्षेत एम. एस.कोठारी अकॅडमी व कनिष्ठ महाविद्यालयाच्या बारावीच्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले. कनिष्ठ महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला. परीक्षेसाठी एकूण २८ विद्यार्थी बसले होते. सर्व विद्यार्थी उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांची ही पहिलीच बॅच असून, हे यश संपादन करण्यात महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका सरिता देशपांडे, पर्यवेक्षिका वैशाली आठल्ये तसेच नाशिक एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष दिलीप फडके, कार्यवाह राजेंद्र निकम, सहकार्यवाह शैलेश पाटोळे, कार्यकारी मंडळ सदस्य व शालेय समिती अध्यक्ष सचिन महाजन यांचे मार्गदर्शन लाभले. प्रणव राठोड ८८.३३ टक्के मिळवून प्रथम, मृण्मयी गोसावी ८७.३३ टक्क्यांसह द्वितीय तर गौरी राजपूत ८५.३३ टक्के मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे.

आर्किड इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

नाशिक । आर्किड इंटरनॅशनल स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी बारावी परीक्षेत १००टक्के यश मिळविले.

रेवती पाटील हिने सर्वात अधिक ९१.३३टक्के गुण मिळवून अव्वल प्रथम क्रमांक मिळविला. ईश्वरी क्षीरसागरने ९१.१७टक्के तर साफिया फिरोजने ९०.६७ टक्के गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

सपकाळ नॉलेज हबचे अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक डॉ. रविंद्र सपकाळ, उपाध्यक्षा कल्याणी सपकाळ, प्रशासकीय अधिकारी डॉ. सचिन हरक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

वावरे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

नवीन नाशिक । प्रतिनिधी

कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा १२ वी परीक्षेचा निकाल विज्ञान विभाग ९९.७१ टक्के, विज्ञान विभाग ९९.७१ टक्के, वाणिज्य विभाग ९६.६७ टक्के लागला.

विज्ञान विभागात प्रथम क्रमांक जयेश ईश्वर पाटील ८९ टक्के, द्वितीय क्रमांक अनुजा भानुदास निकम ८२.५० टक्के, तृतीय क्रमांक वैशाली गणेश गांगुडे ८२.५० टक्के, कला विभागात प्रथम क्रमांक अर्पिता शेषराव सुलताने ८७.३३ टक्के, द्वितीय क्रमांक श्रद्धा सोमनाथ निगळ ८२.१७ टक्के , तृतीय क्रमांक श्वेता भीमा शेलार ७९.५० टक्के , वाणिज्य विभागात प्रथम क्रमांक सिद्धी साहेबराव खैरनार ९१ टक्के , द्वितीय क्रमांक निकिता आधार माळी ८८ टक्के , तृतीय क्रमांक भाग्यश्री जितूभाई जाधव ८७.५० टक्के पटकावला.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे

अध्यक्ष अण्णासाहेब पाटील, मविप्र समाजाचे संचालक अॅड. लक्ष्मण लांडगे तसेच कार्यालयीन अधीक्षक दत्तात्रेय दुसाने, आबा थोरात, सोपान बिडगर, प्राचार्य डॉ सोपान कुशारे, प्रा. दीपक देवरे, उपप्राचार्य प्रा. सोमनाथ घुले, डॉ. रविराज वटने, डॉ. एस. आर. निकम, ज्युनियर कॉलेज प्रमुख प्रा. दीपक देवरे, प्रा. एम. आर. पूरकर, प्रा. एस. एन. निरगुडे आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

शिवचरित्रात आजच्या सर्व समस्यांची उत्तरे : नवाळे

नाशिकरोड । प्रतिनिधी

नाशिकरोड वसंत व्याख्यानमाला

युध्दामध्ये एखादा मावळा मृत्यू पडला तर त्याच्या वारसाला अर्धा पगार आयुष्यभर मिळेल, अशी वेतनाची व्यवस्था छत्रपती शिवाजी महाराजांनी केली होती. जमिनीची मोजणी, शेतीकर्जाची माफी, तसेच कुठल्या मातीत कुठले पीक घ्यायचे, याचे मार्गदर्शन करणारा व शेतकऱ्यांची काळजी करणारा हा एकमेव छत्रपती होता. शिवरायांच्या चरित्रामध्ये आजच्या सर्व प्रश्न व समस्यांची उत्तरे साडेतीनशे वर्षांपूर्वीच दिलेली आहेत, असे प्रतिपादन साहित्यिक विकास नवाळे यांनी केले.

येथील दत्त मंदिररोड, महापालिका शाळा क्रमांक १२५ च्या मैदानावर नाशिकरोड देवळाली व्यापारी बँकेतर्फे वसंत व्याख्यानमाला सुरू आहे. त्यावेळी चौथे पुष्प गुंफताना नवाळे बोलत होते. ढाल-तलवारी पलीकडील छत्रपती शिवाजी महाराज हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. नवाळे म्हणाले की, स्वराज्याचा पाया स्त्रियांच्या सन्मानामध्ये आहे. अफजल खानाचा वध व औरंगजेबाच्या कैदेतून सुटका या दोन घटना संपूर्ण भारतवर्षात मराठ्यांच्या इतिहासाला कलाटणी देणाऱ्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हे अत्यंत मुत्सद्दी होते. अफजल खानाला भेटायला जाताना त्यांनी वाघ नखे सोबत घेतली. तर मिर्झा राजांना भेटताना ते निःशस्त्र गेले होते. छत्रपतींनी सर्व किल्ल्यांवर देशी झाडे लावत पर्यावरणाची काळजी घेतली. सिंधू दुर्गाच्या चहुबाजूंनी खारेपाणी असताना किल्ल्यात मात्र गोड पाणी उपलब्ध आहे. हीच छत्रपतींची सुंदर कार्यपध्दती होती. फडणवीस, हवालदार, किल्लेदार अशा तिघांकडे प्रत्येक किल्ल्याचे प्रशासन महाराजांनी सोपविले होते. इंग्रजांनी नव्हे तर छत्रपतींनी आपल्या मातोश्रींना सती जाऊ न देता सती प्रथेवर सर्वप्रथम बंदी घातली. सुरतची लूट करताना संपूर्ण सूरतच्या गल्लीबोळातील ब्लू प्रिंट छत्रपतींकडे होती. अचूक नियोजनावर शिवरायांनी विशेष भर दिला होता. जात, धर्म, पंथ यामध्ये छत्रपतींनी स्वतःला गुंतवून न घेतल्यामुळे आज देखील छत्रपती सर्वांना आपले वाटतात. अभेद्य किल्ल्यांची निर्मिती, प्रशासनाचे कामकाज, पारदर्शकता यामुळे परदेशी लेखकांनी देखील छत्रपतींना समजून घेत छत्रपती व त्यांच्या कार्यपध्दती बद्दल गौरवोद्गार काढले. छत्रपतींची एकदा नव्हे तर तीनदा वर्षभरात जयंती साजरी केली जाते. काही जण अक्षयतृतीयेला देखील जयंती साजरी करतात. पण आज खऱ्या अर्थाने छत्रपतींच्या विचारांची जयंती साजरी करण्याची गरज असल्याचे नवाळे यांनी सांगितले.

आपले विश्व अद्भूत अन् मनोरंजक : डॉ. पिंपळे

नाशिक । प्रतिनिधी

कन्हाडे ब्राह्मण व्याख्यानमाला

आपल्या डोक्यावरच्या अंतराळात केवळ ग्रह, तारे, उल्का, धुमकेतू नाहीत. आकाशगंगेत अब्जावधी वस्तू आहेत आणि असे अब्जावधी समूह या विश्वात आहेत. विश्वाचा पसारा अतिविराट, अतिविशाल हे शब्द सुद्धा तोकडे पडतील इतका मोठा आहे. आपले विश्व अद्भूत आणि मनोरंजक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ खगोल अभ्यासक डॉ. गिरीश पिंपळे यांनी केले.

नाशिक कन्हाडे ब्राह्मण संघाने आयोजित केलेल्या वासंतिक व्याख्यानात ते 'विश्वाची सफर' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अतिशय सुंदर अशा सुमारे ७० रंगीत स्लाईड वापरून त्यांनी ग्रह, तारे, धूमकेतू, दीर्घिका, कृष्णविवरे, लघुग्रह, उल्का, पल्सार, तेजोमेघ, विविध अवकाश दुर्बिणी अशा अनेक गोष्टींबाबत सोप्या आणि रंजक भाषेत माहिती दिली. संपूर्ण विश्वाची रचना कशी आहे ते विविध

शकतो असे नमूद केले. सुनीता विल्यम्स अवकाश स्थानकात ८ महिने अडकून पडल्या होत्या. या घटनेबाबत त्यांनी श्रोत्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरेही दिली. कन्हाडे ब्राह्मण संघाचे अध्यक्ष नरेंद्र ताटके यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. सहसचिव नरेंद्र पराडकर यांनी प्रास्ताविक केले. सुप्रिया फणसळकर यांनी स्वागतगीत सादर करून परिचय करून दिला तर अॅड. विनयराज तळेकर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी केतन अमृते, सुनील खेर व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी कन्हाडे ब्राह्मण संघाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिंहस्थासाठी एक हजार एकर जमीन अधिग्रहित करणार : आयुक्त खत्री

नाशिक । प्रतिनिधी

वसंत व्याख्यानमाला

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात साधूग्रामसाठी एक हजार एकर जमीन अधिग्रहित करणार आहे. येत्या दोन वर्षांत सर्व जीर्ण मंदिरांचा कायापालट करण्यात येणार असून रामकाळ पथअंतर्गत रामकुंड ते राममंदिर या परिसरातील विकासकामांसाठी शंभर कोटींचा निधी खर्च करणार असल्याचे प्रतिपादन मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी केले.

नाशिकच्या यशवंतराव महाराज पटांगणावर सुरू असलेल्या वसंत व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफताना सिंहस्थ कुंभमेळा त्र्यंबकेश्वर, नाशिक २०२७-२०२८ या विषयावर आयोजित परिसंवादात खत्री बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, महंत भक्तिचरणदास महाराज व अतिरिक्त पोलीस अधीक्षक मिलींकेर, सतीश शुक्ल, देवांग जानी आदी उपस्थित होते.

आयुक्त प्रवीण गेडाम यांनी नाशिकच्या कुंभमेळ्यावर मार्गदर्शन करताना सांगितले की, नाशिकच्या प्रमुख रस्त्यांना राष्ट्रीय महामार्गाशी जोडण्याचे काम पुढील दोन वर्षात करण्यात येणार आहे. नाशिकच्या गंगाघाट परिसरातील पुरातन मंदिरे तसेच त्र्यंबकेश्वरमधील पुरातन मंदिरांचा विकास करण्यासाठी पुरेसा निधी शासनाजवळ उपलब्ध झाला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. प्रयागराजचा कुंभमेळ्याचा अनुभव समोर ठेवून एकूण लोकसंख्येचा आढावा घेऊन जास्तीत जास्त गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे गेडाम यावेळी सांगितले.

इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर डेटा विश्लेषण या अंतर्गत नाशिक ते त्र्यंबकेश्वर यामधील कोणत्या चौकात किती गर्दी झाली

आहे, यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक स्वतंत्र नेटवर्क या प्रणालीद्वारे राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी प्रोजेक्टरद्वारे गेडाम यांनी सांगितले. नाशिक महानगर विकास प्राधिकरण या अंतर्गत देखील दुसरे नियोजन सुरू असल्याचे त्यांनी परिसंवादातून सांगितले.

सिंहस्थ कुंभमेळा परिसंवादानंतर कलानंद कथक नृत्य संस्था प्रस्तुत भक्तिधारा हा कार्यक्रम सादर झाला. संचालिका संजीवनी कुलकर्णी व डॉ. सुमुखी अथणी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. व्याख्यानमालेच्या प्रारंभी स्व. वसंतराव पवार यांच्या जीवन कार्यावर आधारित चित्रफित दाखवण्यात आली. आयुक्त प्रवीण गेडाम यांचा सत्कार प्रणव पवार यांनी केला. तसेच मनीषा खत्री यांचा सत्कार व्याख्यानमालेच्या कार्याध्यक्ष संगीता बाफना यांनी केला.महंत भक्तीचरण दास यांचा सत्कार राजेंद्र शेळके यांनी केला. सूत्रसंचालन, स्वागत आभार व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीकांत बेणी यांनी मानले.